# GOVT. OF MAHARASHTRA PERMISSION LETTER (S)

महाराष्ट्र शासन

क्रमांक:पीसीआय १०९०/[४२२३]तांशि-१
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवा योजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२
दिनांक: २७ जुलै, १९९२.

प्रति,

अध्यक्ष,
महात्मा गांधी तालुका शिक्षण मंडळ,
चोपडा, जिल्हा जळगांव.

विषय:- <u>औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयास परवानगी....</u>

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात आपण शासनाकडे केलेल्या अर्जास व तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावास अनुसरुन राज्य शासनाने आवश्यक तो शिफारस प्रस्ताव १५ सप्टेंबर, १९९० मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे पाठविला होता. त्यावर आता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या क्रमांक:एफ २७-२४/९२-एआयसीटी २३६३, दिनांक ३ जुलै, १९९२ अन्वये पूर्व मान्यता दिली असल्यामुळे शासन याद्वारे आपल्या संस्थेत चोपडा येथे १९९२-९३ या वर्षापासून ३० विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास खालील अटी व शर्तीवर परवानगी देत आहे :-

१] अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र महाविद्यालये विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्यासंदर्भात शासन निर्णय, शिक्षण व सेवा योजन विभाग क्रमांक: टीईएम-३३८२/१११८३६/[१९०]तांशि-१अ, दिनांक २१.५.१९८३ अन्वये तसेच शासन निर्णय, शिक्षण व सेवा योजन विभाग क्रमांक-पीसीआय ६०९१/[४५४१]तांशि-१अ, दिनांक १२.८.१९९१ अन्वये [दोन्ही शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.] विहित करण्यात आलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.

२] अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या क्र. एफ-२७-२४/९२-एआयसीटीई/२३६३, दिनांक ३ जुलै, १९९२ च्या मंजूरी पत्रामध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.

२...

३] या संस्थेच्या संलग्नीकरणासाठी आपणास उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची मान्यता घ्यावी लागेल.

४] शासनाने विहित केलेल्या प्रवेश नियमानुसारच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा लागेल.

५] शासनाने विहित केलेल्या व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी मान्य असल्याबाबत आपणास करारनामा करावा लागेल.

२. आपणास विनंती करण्यात येते की, आवश्यक त्या औपचारिक बाबी पूर्ण करण्यासाठी आपण संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. आपणास असेही सूचीत करण्यात येते की, सर्व बाबींची पूर्तता केल्याशिवाय व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने लेखी स्वरुपात अंतिम परवानगी दिल्याशिवाय अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये.

आपला विश्वासू,

[ गो. तु. धंनमेहेर ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.

१] संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२] कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

३] कक्ष अधिकारी, कार्यासन विशि-२, शिक्षण व सेवा योजन विभाग.

प्रत माहितीसाठी-

१] अतिरिक्त सचिव [तांत्रिक], अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, डी-४७, न्यू दिल्ली साऊथ एक्स्टेंशन, पार्ट-१, नवी दिल्ली ११००४९.

२] सहाय्यक शिक्षण सल्लागार [तांत्रिक], भारत शासन, मनुष्यबळ विकास मंत्रालय [शिक्षण विभाग], पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल ॲश्युरन्स बिल्डींग, २ रा मजला, नरिमन रोड, मुंबई-२०.

३] सचिव, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, १५ शामनाथ मार्ग, नवी दिल्ली - ११००५४.

एसआर